NEHRU BAL PUSTAKALAYA

# भटकबहाद्दर बोकोबा

मेलनी सिक्वेरा
अनुवाद
मुकुंद टाकसाळे



# भटकबहाद्दर बोकोबा

मेलनी सिक्वेरा

अनुवाद

मुकुंद टाकसाळे

चित्रे

हरिंदर सिंग

एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 81-237-3178-7

पहिली आवृत्ती : 2000 (*शके* 1922)

दुसरी आवृत्ती : 2003 (*शके* 1924)

मूळ © मेलनी सिक्वेरा, 1995

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2000

The Stowaway *(Marathi)*

**रु. 12.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

जगभर भटकणारा मार्को पोलो तुम्हाला ठाऊक असेल. आपले हे बोकोबा—'मार्को पुस' त्यांचं नाव—त्याच जातीचे, मांजरातले मार्को पोलोच म्हणानात का, तर एक दिवस या मार्कोबांची—म्हणजे आपल्या बोकोबांची स्वारी भटकत भटकत जाऊन पोहोचली एका बंदरावर. तिथला गडबड गोंधळ, मोठमोठाल्या याऱ्या, मजेमजेशीर वास आणि जहाजाचे अवाढव्य धूड—ते सगळे विश्वच त्याला नवे होते, अनोखे होते.

'अच्छा, पाण्यावरचं घर दिसतंय,' तो मनाशी म्हणाला, 'कित्ती मज्जा!' मग हवेत शेपटी ताठ करून आपला हा भटकबहाद्दर बोकोबा निघाला की जहाजावर! अर्ध्या वाटेत गेल्यावर त्याच्या कानावर एकदम ओरडण्याचा आवाज आला.






'हे...हे मांजर कुणाचं? आणि इथं कसं आलं? द्या त्याला जहाजावरून फेकून!'

पाठोपाठ बोकोबांच्या पाठीत बुटाची सणसणीत लाथ बसली. भटकबहाद्दर बोकोबांना लाथ? त्यांचा अभिमानच दुखावला.

'दाखवतोच एकेकाला! मला फेकून देताय काय? नाही जर या जहाजात परत आलो तर नावाचा 'बोकोबा' नाही,' बोकोबा धुसफुसत म्हणाले.



तिथल्या कोपऱ्यात जे सामान पडलेले होते, त्यात एक भली मोंठ्ठी भाजीची करंडी पडलेली होती. बोकोबांनी ढुसणी मारून करंडीचे झाकण उघडले आणि ते हळूच आत जाऊन बसले. तेवढ्यात तिथे एक माणूस आला आणि त्याने करंडी उचलली. मग बोकोबांची वरात जहाजाच्या दारातून थेट जहाजातल्या स्वैपाकघरात नेण्यात आली. ती करंडी त्या माणसाने स्वैपाकघरात ठेवली.



‘अहो आचारीबुवा, ही घ्या तुमची भाजीपाल्याची करंडी,’ त्या माणसाचा आवाज बोकोबांच्या कानावर पडला.

बोकोबा आतल्या आत घाबरले. आता काय ताट पुढे वाढून ठेवलेले आहे याची धाकधूक त्यांच्या मनात होती. करंडीचे झाकण उघडले गेले. आणि त्यांच्या नजरेस त्या आचारीबुवांचा गब्बू चेहरा दिसला. तो चेहरा बोकोबांकडेच बघत होता. क्षणात बोकोबांनी टुणकन उडी मारली आणि दारातून ते धुमतकाट पळत सुटले. बोकोबांना पकडण्यासाठी आचारीबुवा त्यांच्या मागे पळत सुटले. मागल्या बाजूने बोकोबांना आरडाओरडीचे आवाज येऊ लागले. त्यांना पकडण्यासाठी जहाजावरील आणखीही काही माणसे त्या आचारीबुवांच्या बरोबरीने धावू लागली. हा सगळा गोंधळ ऐकून तिथे कॅप्टन धावत आला.

‘एवढा आरडाओरडा कसला चाललाय? आचारीबुवा! अहो, लाटणं हातात घेऊन कुठं पळत सुटलाय?’


आचारीबुवा धापा टाकत स्पष्टीकरण देऊ लागले, ‘क...क...कॅप्टन, ते त्या भाजीच्या...करंडीत...होतं. काळं मांजर! घाणेरडं कुठलं! माझ्या अंगावरच उडी घेतली त्यानं!’



'हं! म्हणे घाणेरडं!' बोकोबा लपून बसले होते तिथे स्वतःशीच गुरगुरले. त्यांनी तेवढ्यातल्या तेवढ्यात आपल्या अंगावरचा काळा कोट चाटूनपुसून आणखी चकचकीत केला.

'ते तसं सापडणार नाही.' कॅप्टन म्हणाला, 'सगळे आपापल्या कामासाठी सज्ज व्हा. कुणालाही जर ते मांजर दिसलं तर ते सरळ उचलून समुद्रात फेकून द्या, समजलं?'


आचारीबुवा तसे दयाळू अंतःकरणाचे होते. कॅप्टनचा हा फतवा ऐकल्यानंतर त्यांना वाटलं, आपलं जरा चुकलंच. आपण उगाचच गदारोळ माजवला. 'राहीना का



ते जहाजावर कॅप्टन,' ते म्हणाले. 'मांजरं जहाजावर असलेली केव्हाही चांगलीच! ती उंदराची शिकार करतात. आणि खरं सांगू का...मला जर कुठल्या गोष्टीची अगदी मरणाची भीती वाटत असेल तर ती म्हणजे उंदरांचीच!'

आता एका खलाशानेही तोंड उघडले. तो चाचरत म्हणाला, 'सर, जहाजावर मांजर असलेलं चांगलं असतं. शुभशकुनी असतं.'

'वा! शहाणा आहेस! काळं मांजर आणि शुभशकुनी? उलट काळं मांजर दिसणं अपशकुनी मानतात. ते काही नाही. ते मांजर पुन्हा मला माझ्या जहाजावर दिसता कामा नये. ते दिसलं रे दिसलं की त्याला समुद्रात बुडवून टाका, समजलं?'



हे शब्द ऐकून बोकोबांचा तर थरकापच उडाला. त्यांच्या अंगावर काटा उभा राहिला. आणि त्यांना धडकीच भरली! आता काय करावं बरं? बोकोबा मनाशी विचार करू लागले, 'आता—या क्षणी—मी इथे सुरक्षित आहे खरा. पण आज ना उद्या मला माझं अन्न शोधण्यासाठी बाहेर पडावंच लागेल. नशीब! त्या करंडीत खायला तरी भरपूर होतं!'



एवढ्यात बोकोबांना मागे काही तरी खुडबुड ऐकू आली. पटकन मागे वळून त्यांनी झेप घेतली. 'वा! उंदीर!' भीतीने आक्रसलेल्या उंदराला पाहून ते मानभावीपणे उद्‌गारले, 'खरं सांगू का, माझं एक तत्व आहे. मी उंदीर खात नाही, पण नेमकी आज मला भूक लागलेली आहे आणि माझ्या हातात तू आपण होऊन येऊन पडलेला आहेस!'

'बोकोबा, दुर्बळावर पंजा टाकणं तुम्हाला शोभत नाही,' उंदीर म्हणाला.

अचानक बोकोबांच्या डोक्यात एक भन्नाट कल्पना चमकली. त्यांचे निळे डोळे एकदम लकाकले. त्यांनी धमकीवजा स्वरात विचारले, 'हे बघ उंदरा, मी तुला आत्ताच्या आत्ता गट्टम करून टाकलं तर तुला कसं वाटेल?'



'नाही, नाही.' उंदीर जोरजोरात मान हलवून म्हणाला.

आपल्या पंजात उंदराला पकडून त्यांनी समोर धरले, 'उंदरा, मी तुला आत्ता जाऊ देतो. पण माझ्यासाठी एक गोष्ट तू केली पाहिजेस.'

'काहीही—अक्षरशः काहीही—करीन मी तुमच्यासाठी,' उंदराने वचन दिले.

'ऐक तर मग... नीट कान देऊन ऐक...'





त्या संध्याकाळी आचारीबुवांच्या चेहऱ्यावर अतीव समाधान विलसत होते. त्यांनी भला मोठा केक रात्रीच्या जेवणासाठी बनवलेला होता. तो अव्हनमधून बाहेर काढत असतानाच त्यांच्या पावलापाशी काही तरी खुडबुडलं.



'अरे देवा! उंदीर!' आचारीबुवा जोरात किंचाळले.. त्यांच्या हातून तो केक खाली पडला. इकडे तिकडे विखुरला. 'धावा! धावा! स्वैपाकघरात उंदीर!'

कॅप्टन धावत धावत तिथे आला. त्याच्या मागोमाग जहाजावरचे इतर कर्मचारीही धावत आले. बघतात तो काय—आचारीबुवा आपले मेजावर उभे राहून ठणाणा करत आहेत. 'उंदीर! उंदीर! वाचवा! वाचवा! त्या मांजराला आपण उगाच पिटाळलं! ते असतं तर त्यानं नक्कीच त्या उंदिरड्याची शिकार केली असती!'

'मूर्ख कुठचा!' कॅप्टन म्हणाला, 'उंदीर पकडण्यासाठी मांजरच कशाला हवं? पिंजरे लावा म्हणजे झालं!'



इकडे बोकोबांना हसू आवरेना. त्या लपण्याच्या जागी बोकोबांसमोर उंदीरही बसलेला होता. 'शाब्बास छोट्या उंदरा! आपण पहिली फेरी तर जिंकली!' बोकोबा म्हणाले, 'उद्या दुपारच्या जेवणाच्या वेळी मी तुला परत पाठवणार आहे. आता कान उघडे ठेवून ऐक. ते जागोजाग पिंजरे लावणार आहेत. आणि त्यांत चीज ठेवणार आहेत. तू ते खायचं नाही. काय?'

उंदीर हे ऐकून खट्टू झाला. 'पण का? मला तर चीज खूप आवडतं,' तो फुरंगटून म्हणाला.

'ठीक आहे. मग मी तुला खातो,' दात विचकत बोकोबा म्हणाले. 'चीज खाण्यासाठी पिंजऱ्याच्या जवळ जायचा अवकाश की तू पकडला जाणार आणि ते तुला मारणार. तेव्हा असा ना तसा तू मरणारच. मग मीच का खाऊ नये तुला?'

उंदीर हे ऐकून चांगलाच गडबडला. 'बरं बरं...मी पिंजऱ्याजवळ जाणार नाही. मी वचन देतो,' तो घाईघाईने म्हणाला.





दुसऱ्या दिवशी आचारीबुवा केकची तयारी करत असताना अचानक उंदीर टेबलावरून पळाला. तो क्षणात इकडून तिकडे गेला खरा, पण तेवढ्यात आचारीबुवांच्या हातून बेकिंग पावडरचे आख्खे खोकेच समोरच्या वाडग्यात उपडे झाले. जेव्हा आचारीबुवांनी केक अव्हनमध्ये ठेवला तेव्हा तो इतका फुगला, इतका फुगला की ज्याचे नाव ते! तो फुगून फुगून सगळीकडे पसरला, सांडला. आचारीबुवांना रडूच कोसळलं.

कॅप्टन आता चांगलाच रागवला होता. त्याला या साऱ्याच प्रकाराची काळजी वाटू लागली.

'हे चालायचं नाही, आचारीबुवा,' कॅप्टन त्यांच्या अंगावर ओरडला, 'दोन दिवस बघतोय, जेवणाचा बट्ट्याबोळ चाललाय नुसता! जहाजावरचे प्रवासी ठणाणा करताहेत!'

दुसरा दिवस याहूनही भयंकर म्हणायचा. वारंवार स्वैपाकघरात दिसणारा उंदीर पाहून आचारीबुवा इतके काही अस्वस्थ झाले की त्यांनी त्या गडबडीत पुडिंगमध्ये साखरेऐवजी मीठ घातले आणि चॉकलेटऐवजी कॉफी घातली.

आता मात्र प्रवासी चांगलेच वैतागले. ते कॅप्टनच्या अंगावर ओरडलेच, 'आता आयुष्यात कधीही तुमच्या जहाजातून प्रवास करणार नाही!'




जहाजावर एक दिवस सर्व प्रवाशांना जंगी मेज़वानी दिली जाते. मेजवानीचा हा दिवस आता उजाडला तरी उंदरांचे सगळे पिंजरे अजून रिकामे होते.

'मी नाही स्वैपाक करणार.' हुंदके देत आचारीबुवा म्हणाले,' तो उंदीर नक्की मध्ये कडमडणार हे मला चांगलं ठाऊक आहे!'

'मूर्खपणा करू नका, आचारीबुवा,' कॅप्टन गुरकावला, 'तुम्ही तुमचं काम करा व्यवस्थित. जहाजावरच्या प्रवाशांसाठी काहीतरी झकास बेत करा म्हणजे त्यांचं डोकं तरी थोडं शांत होईल. मी काही खलाशांना काठ्या घेऊन इथं उभं करतो. उंदीर दिसायचा अवकाश की ते त्याचा बंदोबस्त करतील. तुम्ही खुशाल तुमचा स्वैपाक करा.'

'कॅप्टनची मुक्ताफळे ऐकलीत का बोकोबा?' उंदीर घाबरून म्हणाला, 'ते आता काठी घेऊनच माझी वाट पाहत बसणार आहेत!'




पुणे



'याचा अर्थ आपल्याला आत्ताच हालचाल करायला हवी,' बोकोबा म्हणाले, 'आता आचारीबुवा स्वैपाकासाठी शिधा काढत असतील आणि कॅप्टन त्याची माणसं गोळा करत असेल. हीच-हीच वेळ आहे 'हल्ला बोल' करण्याची.'

उंदराने लगेचच तिथून काढता पाय घेतला. विजेच्या चपळाईने तो दारातून घुसला. टेबलाच्या पायावरून तुरुतुरु वर चढला आणि त्याने तोंडात टोस्ट पकडला. आचारीबुवा कपाटाच्या खालच्या खणातून काहीतरी काढण्यासाठी वाकले होते. तेवढ्यात कॅप्टनची चाहूल लागली. त्याबरोबर उंदराने थेट आचारीबुवांच्या मानेवरच उडी घेतली. 'पकडा! पकडा!' असे ओरडत कॅप्टन धावला. पण तेवढ्यात उंदराने पोबारा केला होता.

बिचारे आचारीबुवा! जिवाच्या आकांताने एक किंकाळी फोडून त्यांनी टुणकन उडी मारली. त्यामुळे त्यांचे डोके कपाटाच्या कोपऱ्यावर ठणकन आपटले. आणि मग तिथला गोंधळ काय विचारता!

हा हा म्हणता सर्वत्र बातमी पसरली—'कॅप्टनच्या डोळ्यादेखत उंदराने टोस्ट चोरला आणि कॅप्टनच्या नाकावर टिच्चून उंदीर आचारीबुवांच्या मानेवर उडी मारून पसार झाला.'

'हा काही साधा उंदीर दिसत नाही.' खलाशी आपापसात कुजबुजू लागले.

'मला आताच्या आता जहाजावरून खाली उतरवा,' आचारीबुवा रडवेल्या स्वरात म्हणाले, 'मला लाइफ बोट द्या. मी चाललो. मला या जहाजावर आता क्षणभरही राहणं शक्य नाही. तो नतद्रष्ट उंदीर माझ्या जिवावरच उठलाय.' अजूनही मानेवरचा आचारीबुवांचा हात थरथर कापत होता.





नेमका याच वेळी बोकोबांनी ठरवून नाट्यमय प्रवेश केला. ऐटीत, हवेत शेपटी उंचावत, कुणालाही न घाबरता, आपल्याच गुर्मीत.

'तेच ते मांजर!' अशी कुजबूज झाली.

बोकोबांनी एखाद्या गुप्तहेराच्या थाटात जमिनीचा वास घेतला.

'अगदी शेरलॉक्स होम्ससारखाच करतोय हा!' कुणीतरी कौतुकाने पुटपुटले.

जमीन हुंगत हुंगत बोकोबांनी भोजनगृहापर्यंत माग काढला आणि ते बाहेर पडले. याच मार्गाने उंदीर पळाला होता. दहा मिनिटातच बोकोबा तोंडात टोस्ट धरून हजर झाले आणि त्यांनी तो टोस्ट आचारीबुवांच्या पावलापाशी नेऊन टाकला. नंतर त्यांनी नुकतेच पोटभर जेवण करून आल्याच्या थाटात, म्हणजेच आख्खा उंदीर खाऊन आल्याच्या थाटात आपली जीभ बाहेर काढून चेहरा चाटूनपुसून लख्ख करायला सुरुवात केली.

'त्यानं पकडला उंदीर! नक्की पकडला!' बोकोबांना उचलून घेऊन आचारीबुवा आनंदाने ओरडले.

'नुसता पकडलाच नाही तर खाल्लेलासुद्धा दिसतो.' एक खलाशी म्हणाला.

'काय वो कॅप्टन? दिऊ का याला समुद्रात फेकून?' एका भोचक खलाशाने विचारले.

कॅप्टनला शरमल्यासारखे झाले. 'राहू द्या त्याला इथंच,' खाली वाकून बोकोबांना थोपटत तो करड्या आवाजात म्हणाला, 'आणि हे बघा, त्याची पुढच्या सगळ्या प्रवासात नीट काळजी घ्या.'


'त्याची काळजीच करू नका, कॅप्टन,' आचारीबुवा म्हणाले, 'त्याला दिवसातून तीनदा माझ्या हाताने मी जेवायला घालतो, मग तर झालं?'



त्या रात्री बोकोबा आपल्या लपायच्या जागी आले. आता त्या जागेची त्यांना जरूर नव्हती. एवढ्यात तिथल्या अंधारातून हळूच उंदीर बाहेर आला. त्याने बोकोबांनी खास त्याच्यासाठीच म्हणून आणलेला चीजचा तुकडा मटकावला. नंतर तो बोकोबांच्या पायाला आपले अंग घासू लागला.

'उंदरा, आता तुला माझी भीती वाटत नाही तर!' बोकोबा म्हणाले.

'नाही बोकोबा, मुळीच नाही.' उंदीर मांजराकडे रुबाबात पाहत उत्तरला, 'कारण पुन्हा जर तुमचं त्या आचारीबुवांशी किंवा कॅप्टनशी भांडण झालं तर तुम्हाला माझी गरज लागणारच आहे.'



रु. 12.00 ISBN 81-237-3178-7

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

